# जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
# तलाठी पदभरती - २०१६

## सूचना

तलाठी संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता दिनांक १ ऑगस्ट,२०१६ रोजी जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती व त्यानुसार दिनांक २१ ऑगस्ट,२०१६ रोजी सायंकाळी ०५.४५ वाजेपर्यंत अर्ज मागविण्यात आलेले होते.

**तलाठी** पदाच्या लेखी परीक्षेकरीता पात्र /अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात येत असून त्यावर काही आक्षेप असल्यास दिनांक २८ ऑगस्ट,२०१६ पर्यंत कार्यालयीन वेळेत स्वत: उपस्थित होवून किंवा **collngpbharti2015@gmail.com** या ई-मेल आयडीवर आक्षेप नोंदवावे. विलंबाने प्राप्त झालेल्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही.

शासनाचे पुर्वनिर्धारित वेळापत्रकानुसार तलाठी पदाकरीता दिनांक ११ सप्टेंबर,२०१६ रोजी लेखी परीक्षा घेण्यात येणार असून दिनांक ५ सप्टेंबर,२०१६ प्रवेशपत्र जाहीरातीत नमुद केलेल्या संकेत स्थळावर उपलब्ध होतील.

प्रवेशपत्र प्राप्त करुन घेण्यास अडचण निर्माण झाल्यास दिनांक १० सप्टेंबर,२०१६ रोजी कार्यालयीन वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयातून प्रवेशपत्र उपलब्ध करुन देण्यात येईल.

रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन, नागपूर यांचेकडील उमेदवारांच्या यादीतील उमेदवारांचे देखील प्रवेशपत्र संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

दिनांक:- २५ ऑगस्ट,२०१६

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती
तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
नागपूर.

अध्यक्ष
जिल्हा निवड समिती
तथा जिल्हाधिकारी,
नागपूर.